साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शफीखॉ इब्राहिमखॉ पठाण,
वय ५७ वर्ष, व्यवसाय–रोजमजुरी
राह.सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर.

सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत

१. घटना दिनांक १८/०३/२०२२ रोजीची आहे. सदर दिवशी आम्ही कामावरून आलो असता मला फोन आला व सांगितले की, तुमच्या मुलाचा अपघात झाला आहे. त्यानंतर आम्ही तेथे गाडी घेउन गेलो. त्यानंतर आम्ही घटनास्थळावर पाहिले असता गाडी समोर होती व सदर गाडीच्या मागच्या चाकामध्ये माझा मुलगा मकबुलखॉ पठाण हा अडकलेला होता. त्यावेळी मला तेथे माहित झाले की, माझा मुलगा पिपळाकडुन पलसर मोटारसायकलने येत होता त्यावेळी समोरून सिर्सीकडुन आयसर कंपनीची गाडी आली व त्याला ठोस मारली असे लोकांनी सांगितले. सदर आयसर गाडीचा नंबर मला लक्षात नाही. त्यावेळी माझा मुलगा थोडा जिवंत असल्याने आम्ही त्याला गाडीत टाकुन पि.एच.सी. सिर्सी येथे नेले. त्यावेळी तेथे डॉक्टर नसल्याने आम्हाला तेथुन दुसरीकडे दवाखाण्यात जाण्यास सांगितले असता आम्ही थोड्या अंतरावर गेलो त्यावेळी माझ्या मुलाची हालचाल कमी वाटली. त्यानंतर पुन्हा आम्ही सिर्सी येथे दवाखाण्यात आलो. सदर दवाखाण्यामध्ये तीन तास सरकारी डॉक्टर हजर नव्हते. सदर दवाखाण्यामध्ये डॉक्टर तीन तासापासुन हजर नसल्यामुळे माझ्या मुलाला उपचार मिळाला नाही. त्यानंतर तेथेच माझा मुलगा मरण पावला. त्यानंतर मी सदर घटनेची पो.स्टे.ला फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. ज्या आरोपीने त्याची आयसर गाडी चालवुन अपघात घडविला त्याला पाहिल्यास मी ओळखु शकत नाही कारण मी त्याला पाहिलेच नव्हते.

सरतपास संपला.

आरोपीतर्फे ॲड. श्री. पि. वाय.सुखदेवे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.

२. हे म्हणणे खरे आहे की,मला अपघाताबाबत फोनवरून माहिती मिळाली होती. घटनेच्या वेळी मी माझ्या घरीच होतो त्यामुळे आयसर गाडी कोण चालवित होते हे मला माहिती नाही. मी पोलिसांना फिर्याद व बयाण देतांना 'सदर दिवशी आम्ही कामावरून आलो असता मला फोन आला व सांगितले की, तुमच्या मुलाचा अपघात झाला आहे, त्यानंतर आम्ही तेथे गाडी घेउन गेलो, त्यानंतर आम्ही घटनास्थळावर पाहिले असता गाडी समोर होती व सदर गाडीच्या मागच्या चाकामध्ये माझा मुलगा मकबुलखॉ पठाण हा अडकलेला होता, त्यावेळी मला तेथे माहित झाले की, माझा मुलगा पिपळाकडुन पलसर मोटारसायकलने येत होता त्यावेळी समोरून सिर्सीकडुन आयसर कंपनीची गाडी आली व त्याला ठोस मारली असे लोकांनी सांगितले, सदर आयसर गाडीचा नंबर मला लक्षात नाही, त्यावेळी तेथे डॉक्टर नसल्याने आम्हाला तेथुन दुसरीकडे दवाखाण्यात जाण्यास सांगितले असता आम्ही थोड्या अंतरावर गेलो त्यावेळी माझ्या मुलाची हालचाल कमी वाटली, त्यानंतर पुन्हा आम्ही सिर्सी येथे दवाखाण्यात आलो' इ.मजकूर सांगितला होता. आता मला माझी फिर्याद व बयाण दाखविण्यता आले त्यामध्ये सदर मजकूर जसाच्या तसा नमुद नाही तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील मजकूर मी घटनास्थळावरिल लोकांनी सांगितलेल्या माहीतीप्रमाणे सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटा रिपोर्ट दिला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२५.०९.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड